# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०५/०७/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा तेलंगखेडी फाटा येथे दिनांक ०३/०७/२०२२ चे १३.०० वा. ते १३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— मनोहर पैतराम बारापात्रे वय ६२ वर्ष, रा. खापा वॉर्ड क्रं ०२, त. सावनेर हे आपली एम.एच.—४०/बी.एच.—८४१० क्रमांकाची होन्डा ॲक्टीव्हा कंपणीची मोपेड गाडीने खापा वरून नांदा कडे कपड्याची पिशवी दिड डर्जन घेवून नांदा गावात विकणे कामी जात असता ॲक्टीव्हा गाडीचे मागचे चाकाचे एक्सल नट तुटुन कुठेतरी पडले त्यामुळे फिर्यादीची गाडी अनबॅलेन्स झाल्याने त्यांनी ॲक्टीव्हा गाडी ही तेलंगखेडी येथे उभी करून लॉक करून गाडीचे सामान आणने कामी सावनेर येथे गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किं. ३५,०००/— रू. ची मोपेड चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कामठे मो.क्र. ९९२३२१०३४४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत अर्धा कि.मी. अंतरावरील मौजा तिरूपती वाईन शॉप बुटीबोरी येथे दिनांक १६/०६/२०२२ चे २०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— समीर बाबाराव लुंगे वय २४ वर्ष रा.वार्ड क्रं. ०२ जुनीवस्ती बुटीबोरी व त्याचा मित्र हे दोघेही मित्राचा वजन काटा परत करण्याकरिता त्यांच्या मित्र प्रफुल भोयर याच्या कडे त्यांची एमएच— ४०/बिक्यु— ६७२३ क्रमांकाच्या मोटरसायकलने गेले. त्यांनी त्यांची मोटरसायकल तिरूपती वाईन शॉप समोर उभी करून दुकानात आत गेले. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. २५,०००/—रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मांढरे मो.क्र. ९४२०२१५८२३ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील एन.एच.५३ भंडारा ते नागपूर गुमथळा शिवार येथे दिनांक ०२/०७/२२ चे १९.२० वा. ते १९.४२ वा. सुमारास अनोळखी पुरुष ईसम वय अंदाज ४० ते ४५ वर्ष हा एन. एच.५३ भंडारा ते नागपूर कडे जाणारा रोड ओलांड असतांना भंडारा ते नागपूरकडे जाणाऱ्या अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून अनोळखी ईसमास धडक दिली. त्यामुळे अनोळखी ईसम जागीच मरण पावला. यातील अज्ञात आरोपी हा आपले ताब्यातील वाहन घेवून घटनास्थळावरुन पसार झाला.

सदर प्रकरणी सहायक फौजदार संजय देशमुख पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३०४ अ भादवी सहकलम १८४,१३४,१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद

करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक डोईफोडे मो.क्र. ९८२३३०१४७४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील एन.एच.५३ नागपूर ते भंडारा रोड आर आर कंपनी समोर गुमथळा शिवार येथे दिनांक ०४/०७/२२ चे ०३.४० वा. ते ०३.५० वा. सुमारास एम.एच.—३०—बीडी—०९११ क्रमांकाचा १२ चकका कंटेनर ट्रॅकचा चालक आरोपी नामे— शेख जूनैद शेख सुलेमान वय ३२ वर्ष, रा. वाशिम रोड, अकोला याने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्याच्या समोर चालीत असलेल्या आर.जे.—२५/जी.ए.—२९२२ क्रमांकाच्या १८ चक्का ट्रेलरला मागुन धडक दिली. या अपघातात आरोपी आपण स्वत: जखमी होण्यास व क्लीनर शेख राजीक रमन शेख रहमान, वय ४७ वर्ष, रा. अकोला याच्या मृत्युस कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी पोलिस उपनिरीक्षक श्री जगदीश बिरोले पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवी १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सतिश सोनेकर मो.क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**३) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील समिर कॉटन मिल समोर घुबडमेट काटोल येथे दिनांक ०३/०७/२०२२ चे २३.०० वा. सुमारास गाडी चालक नामे— मयंक संतोष शर्मा, वय २२ वर्ष, रा. पंचवटी काटोल याने त्याचे ताब्यातील एमएच— ०५/एजे— ६७३२ क्रमांकाची मारूती सुझुकी गाडी ही घुबडमेंट वरुन सावनेर मार्गावर धोकादायकरित्या भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन समिर कॉटन मिलच्या वॉल ला धडक दिली. या अपघातात त्याची गाडी पलटी झाल्याने फिर्यादीच्या जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला व परितेश लीलाधर खेकाडे (मृतक), वय २२ वर्ष, रात्र राउतपुरा काटोल हा गाडीमध्ये मागच्या सीटमध्ये बसलले असल्याने गाडीमध्ये दबल्याने तो जागीच मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गुणसागर सहदेव डोंगरे, वय २४ वर्ष, रा. कुणबीपुरा काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३७,३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री आगासे मो नं. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**